वाचा :- १. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडिल परिपत्रक क्र.संकिर्ण२०१७/प्र.क्र.४४/ आरोग्य३, दि.४/४/२०१९
२. प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, प्रादेशिक कार्यालय,पुणे यांचेकडिल पत्र क्र.म.प्र.नि.मं./प्राका/१९०६२६-FTS-०१८५, दि.२६/६/२०१९

---

जिल्हाधिकारी कार्यालय,पुणे
सर्वसाधारण शाखा
क्र.सशा/पसह/कावि/१६६३/२०१९
दि. ___/६/२०१९
२/७/२०१९

**विषय :- जैविक वैद्यक कचरा बाबत जिल्हास्तरीय समिती स्थापन करणेबाबत.**

**आदेश**

उक्त वाचा क्र.१ च्या शासन निर्णयान्वये २०१६ मधील नियम ११(११) नुसार अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव, राज्यस्तरीय सल्लागार समितीची स्थापना करण्यास संदर्भ क्रमांक १ येथील शासन निर्णयानुसार मान्यता देण्यात आली होती. जैव वैदयकिय कचरा अधिनियम, २०१६ अंतर्गत नियमांची योग्यरित्या अंमलबजावणी केली जाते अथवा नाही यावर देखरेख ठेवणे, सदर अधिनियम अंतर्गत सल्ला देण्याचे तसेच सदर अधिनियमात सुधारणा झाल्यास त्याबाबत सल्ला देण्याचे काम राज्यस्तरीय सल्लागार समितीचे आहे. राज्यस्तरीय सल्लगार समितीप्रमाणेच जिल्हास्तरावर जिल्हास्तरीय सल्लागार समिती कामकाज पाहिल असे या शासन निर्णयामध्ये नमूद करण्यात आले आहे. त्यानुसार जिल्हास्तरावर जिल्हास्तरीय सल्लागार समिती स्थापन करणे आवश्यक असल्याने या संदर्भात जैव-वैदयकिय कचरा अधिनियम-२०१६, अंतर्गत जिल्हास्तरावर कामकाज पाहण्यासाठी जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्याचे निर्देश दिलेले आहेत. त्यानुसार खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात येत आहे.

| अ.क्र. | समितीची रचना | पद |
|---|---|---|
| १. | जिल्हाधिकारी | अध्यक्ष |
| २. | जिल्हा शल्य चिकित्सक | सदस्य |
| ३. | जिल्हा आरोग्य अधिकारी | सदस्य |
| ४. | उपआयुक्त, पुणे व पिंपरी-चिंचवड महानगरपालिका | सदस्य |
| ५. | मुख्य आरोग्य अधिकारी, महानगरपालिका | सदस्य |
| ६. | प्रादेशिक अधिकारी, जिल्हा प्रदुषण नियंत्रण मंडळ | सदस्य सचिव |
| ७. | इंडियन मेडिकल असोसिएशन | प्रतिनिधी |

जिल्हाधिकारी

**(नवल किशोर राम)**
**जिल्हाधिकारी, पुणे**

**प्रति,**

प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, प्रादेशिक कार्यालय,पुणे

२/- उपरोक्त समिती वरील आदेशान्वये गठीत करण्यात आलेली असल्याने सदर समितीची बैठक नियमित बोलावुन समितीचे कामकाज कार्यान्वित करुन बैठकीचे इतिवृत्तांत या कार्यालयास सादर करावे. तसेच सोबतच्या

आदेशाच्या प्रती संबंधित सदस्यांना बजावून तयांची दिनांकित स्वाक्षरी घेणेत यावी. तसेच उक्त नमूद शासन निर्णयात दिलेल्या तरतुदींनुसार कार्यवाही करणेत यावी.

सही xxx
**(डॉ.जयश्री कटारे)**
**निवासी उपजिल्हाधिकारी पुणे**

**प्रत:-** मा.विभागीय आयुक्त,पुणे विभाग,पुणे यांजकडे सविनय सादर